प्रकरण पाचवे

# सारांश, निष्कर्ष व शिफारशी

**प्रकरण पाचवे**

# सारांश, निष्कर्ष व शिफारशी


| | | |
|---|---|---|
| ५.० | प्रस्तावना | १२४ |
| ५.१ | संशोधन अहवालाचा प्रकरणनिहाय सारांश | १२४ |
| ५.२ | संशोधनाची गरज | १२५ |
| ५.३ | संशोधन समस्येचे विधान | १२५ |
| ५.४ | समस्या विधानातील परिभाषिक सज्ञांचा अर्थ | १२५ |
| ५.५ | उद्दिष्टे | १२७ |
| ५.६ | गृहितके | १२८ |
| ५.७ | व्याप्ती | १२८ |
| ५.८ | मर्यादा | १२९ |
| ५.९ | संशोधन प्रकरण योजना | १२९ |
| ५.१० | संशोधनाचे निष्कर्ष | १३१ |
| ५.११ | शिफारशी | १३४ |
| ५.१२ | पुढील संशोधनासाठी विषय | १३५ |
| ५.१३ | संदर्भ ग्रंथ सूची | १३६-१३८ |

**परिशिष्टे**

अ) प्रमाणित प्रश्नावली व वर्तनश्रेणीतील भाषांतरातील दुरुस्त्या सुचविण्याबाबत.

ब) प्रमाणित प्रश्नावली व वर्तनश्रेणीतील भाषांतरातील दुरुस्त्या सुचविणाऱ्या तज्ञांची यादी

क) प्रश्नावली व श्रेणी सोडविण्याबाबतची पत्रे

ड) मुख्याध्यापकाचे प्रशासकीय वर्तन मापनश्रेणी (मराठी)

इ) शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठाचे पत्र

ई) शालेय संघटनात्मक वातावरण वर्तन प्रश्नावली (मराठी)

प) Headmaster Administrative Test (English)

फ) School Organizational Climate Deiscription Questionnari (Eng.)

ब) मराठी व इंग्रर्जी माध्यमाच्या मुख्याध्यापकांची प्रश्नावली व वर्तनश्रेणी सोडविण्याबाबतची पत्रे.

## प्रकरण पाचवे

# सारांश, निष्कर्ष व शिफारशी

### ५.० प्रस्तावना

मागील प्रकरणात संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केलेले आहे. या प्रकरणात प्रस्तुत संशोधन अहवालाचा प्रकरणनिहाय सारांश दिला आहे. यामध्ये संशोधनातील ठळक निष्कर्ष आणि शेवटी प्रस्तुत संशोधनावर आधारित शिफारशी व पुढील संशोधनासाठी विषय सुचविले आहेत.

### ५.१ संशोधन अहवालाचा प्रकरणनिहाय सारांश

स्वातंत्र्योत्तर कालावधीनंतर भारताने लोकशाही दृष्टिकोन स्वीकारला, त्यामुळे शालेय व्यवस्थापन व प्रशासनाचे विकेंद्रीकरण झाले. शैक्षणिक व्यवस्थापनाच्या घटकात नियोजन संघटन, समन्वय, दिग्दर्शन, संप्रेषण, निर्णय प्रक्रिया, नियंत्रण आदींचा समावेश होतो. यांच्यामध्ये विकास झाला तर शालेय व्यवस्थापन मजबूत होते.

शालेय कारभार चालविण्यासाठी ज्या कार्यक्षम व्यक्तीची प्रमुख म्हणून नेमणूक केली जाते, त्या व्यक्तीला मुख्याध्यापक असे म्हणतात. या प्रकरणात मुख्याध्यापकाची कार्ये, जबाबदाऱ्या कर्तव्ये त्यांना पार पाडावी लागणारी प्रशासकीय कामे यांचा ऊहापोह केलेला आहे. नेतृत्वासाठीचे गुण कोणते तसेच मुख्याध्यापकाचे प्रशासकीय वर्तन चांगले कसे राहील, याची चर्चा केलेली आहे. विद्यार्थ्यांबरोबर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांबरोबर, शासकीय कर्मचाऱ्याबरोबरचे संबंध सुधारण्यासाठी त्याचे वर्तन चांगले असायला हवे.

शालेय संघटनात्मक वातावरण चांगले कसे राहील व त्यामुळे मुख्याध्यापक-शिक्षक, शिक्षक-शिक्षक, मुख्याध्यापक-शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षक-विद्यार्थी यांच्यात संबंध चांगले राहून शालेय वातावरण निरोगी राहील. मुख्याध्यापकांचे प्रशाकीय वर्तनावरील शाळेचे संपूर्ण संघटनात्मक वातावरण अवलंबून असते. त्यामुळे ती एक आदर्श शाळा बनण्यास पात्र ठरते, शालेय संघटनात्मक वातावरणात खुले वातावरण, स्वतंत्र वातावरण, कौटुंबिक वातावरण, नियंत्रित वातावरण, पालकत्वाचे वातावरण, बंदिस्त वातावरण या घटकांचा समावेश आहे.

यामुळे मुख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तन कसे राहील व त्याचे शाळांच्या संघटनात्मक वातावरण चांगले कसे राहील, यातून समस्येचा चांगला उपयोग मुख्याध्यापकांना व प्रशासकीय यंत्रणेला राहणार आहे.

डॉ. हासीन ताज याची मुख्याध्यापकांची प्रशासकीय वर्तन मापन श्रेणी व डॉ. मोतिलाल शर्मा यांची शालेय संघटनात्मक वातावरण प्रमाणित प्रश्नावलीचा अभ्यास केलेला आहे.

### ५.२ संशोधनाची गरज

मुख्याध्यापकांना प्रवेश प्रक्रियेतील अडचणी, शिस्त, विद्यार्थ्यांच्या संपादणुकीबाबत, शालेय वातावरणाबाबत संशोधन झालेले होते. पण मुख्याध्यापकांना येणाऱ्या अडचणी कमी होण्यासाठी, प्रशासकीय कामाचा दर्जा सुधारण्यासाठी, मुख्याध्यापकांचे प्रशिक्षणवर्ग आयोजित करण्यासाठी, उपमुख्याध्यापक व पर्यवेक्षक यांच्या माहितीसाठी मुख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तन व शालेय संघटनात्मक वातावरण यांचा परस्पर संबंध याबद्दल संशोधन होणे गरजेचे होते.

### ५.३ संशोधन समस्येचे विधान

**कोल्हापूर शहरातील माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तन आणि त्यांच्या शाळांचे संघटनात्मक वातावरण यांचा परस्परसंबंध- एक अभ्यास.**

### ५.४ समस्या विधानातील परिभाषिक संज्ञाचा अर्थ

**कोल्हापूर शहर**

कोल्हापूर महानगरपालिकेच्या चतुःसीमेमध्ये येणारा महसूली विभाग (कोल्हापूर गॅझेट)

**माध्यमिक शाळा**

माध्यमिक शाळा म्हणजे इयत्ता दहावीच्या शेवटी शाळांना प्रमाणपत्र परीक्षेस किंवा शासनाने समकक्ष मानलेल्या अन्य परीक्षेस बसण्याकरिता सर्वसाधारण शिक्षणाच्या अभ्यासक्रमाची सोय करणारी शाळा अशा शाळेत पाचवीपासून किंवा त्यानंतरच्या अभ्यासक्रमाची सोय आहे, परंतु दहावी इयत्तेनंतरच्या शिक्षणाची सोय असणार नाही.

सार्वजनिक विश्वस्त संस्था मुंबई अधिनियम १८६० व १९५० अन्वये नोंदणीकृत संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या ज्या माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांना शासनाची अधिकृत परवानगी असून, ज्यांना शासनाने अनुदान मंजूर केलेले आहे. अशा शाळा होय.

(माध्यमिक शाळा संहिता- १९८०)

प्रस्तुत संशोधनामध्ये कोल्हापूर शहरातील मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळा की ज्या पाचवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण देतात, तसेच आठवी ते दहावीपर्यंत शिक्षण देतात. अशा माध्यमिक शाळांचा

विचार केलेला आहे.

(प्रस्तुत संशोधनामध्ये कोल्हापूर शहरातील ३३ मराठी माध्यमांच्या व ६ इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा विचार केलेला आहे.)

**मुख्याध्यापक**

शाळा व्यवस्थितपणे चालविण्यासाठी व्यवस्थापनाने नियुक्ती केलेली जबाबदार अशी व्यक्ती म्हणजे मुख्याध्यापक होय.

(माध्यमिक संहिता १९८०)

प्रस्तुत संशोधनात कोल्हापूर शहरातील मराठी आणि इंग्रजी माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकाच्या प्रशासकीय वर्तनाचा अभ्यास केलेला आहे.

**प्रशासन**

प्रशासन म्हणजे नियोजन करणे, संघटित करणे, समन्वय करणे व नियंत्रण करणे होय.

(जाधव व माने. २००४)

**प्रशासकीय वर्तन**

निश्चित केलेल्या पद्धतीप्रमाणे कार्य चालविण्याच्या दृष्टीने निरनिराळ्या नियंत्रणाचा आणि अधिकाराचा वापर करून एकूण कामकाजावर नियंत्रण ठेवणे उपलब्ध साधनसामुग्री, मनुष्यबळ याचा जास्तीत जास्त आणि परिणामकारक उपयोग होईल, अशा अनुरूप कार्यक्रमाद्वारे मानवी गुणाचा विकास प्रभावीपणे करण्याची प्रक्रिया व त्यानुसार त्याने आपले वर्तन ठेवणे म्हणजे प्रशासकीय वर्तन होय.

(डॉ. अरविंद दुनाखे, १९९९)

Administrative behaviour means a behaviour which is directed towords planned procedure and use of control & power to achive maximum benifits from available resources and manpower.

(Dr. (Mrs.) Haseen Taj 1998)

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने मुख्याध्यापकाचे प्रशासकीय वर्तन अभ्यासण्यासाठी डॉ. हसीना ताज यांच्या प्रमाणित प्रशासकीय वर्तन श्रेणीचा वापर केला आहे.

**संघटनात्मक वातावरण**

उद्दिष्टये प्राप्त व्हावी व विविध व्यक्तींना एकत्रितरीत्या परिणामकारक काम करणे शक्य व्हावे, म्हणून करावयाची कामे निश्चित करणे व ती योग्य गटात विभागणे वैयक्तिक अधिकार व जबाबदाऱ्या शब्दबद्ध करणे प्रदान करणे, विविध कर्मचाऱ्यांत योग्य संबंध स्थापित करणे यास संघटन म्हणतात व याच्यातील वातावरण पोषक ठेवणे याला संघटनात्मक वातावरण म्हणतात.

(अरविंद दुनाखे, १९९८)

Organizational climate might be defined as the global assessment of the interaction between the task-achievement dimension and the needs-satisfaction dimension within the organization.

(Lonsdale Richard 1964)

शाळेच्या संघटनात्मक वातावरणामध्ये मुख्याध्यापकाचे नेतृत्व मुख्याध्यापक व शिक्षक यांच्यामधील आंतरक्रिया, शिक्षक यांच्यामधील आंतरक्रिया, शिक्षक-विद्यार्थी यांच्यातील आंतरक्रियांचा समावेश होतो.

(डॉ. शर्मा, १९८०)

प्रस्तुत संशोधनामध्ये डॉ. शर्मा यांची School Organizational Climate Description Questionnaire (SOCDQ) या प्रमाणित प्रश्नावलीचा वापर करून शाळेचे संघटनात्मक वातावरण अभ्यासले आहे.

**एक अभ्यास**

या संशोधन समस्येच्या शोधनिबंधाचा पुरता एक अभ्यास म्हणजे सूक्ष्म, सखोल, सांगोपांग, तपशीलवार आणि समीक्षणात्मक अभ्यास होय.

संशोधन समस्येच्या दृष्टिकोनातून एक अभ्यास म्हणजे माध्यमिक शाळा मुख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तन व संघटनात्मक वातावरण यांचा अभ्यास होय.

**५.५ संशोधनाची उद्दिष्टे**

प्रस्तुत संशोधनामध्ये खालील प्रकारे मुख्य आणि दुय्यम उद्दिष्टे मांडण्यात आलेली आहेत.

**संशोधनाची मुख्य उद्दिष्टे**

१) कोल्हापूर शहरातील मराठी व इंग्रजी माध्यमिक शाळांमधील मुख्याध्यापकांच्या प्रशासकीय वर्तनाचा अभ्यास करणे.

२) कोल्हापूर शहरातील मराठी व इंग्रजी माध्यमिक शाळांच्या संघटनात्मक वातावरणाचा अभ्यास करणे.

३) कोल्हापूर शहरातील माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकाचे प्रशासकीय वर्तन व त्यांच्या शाळेचे संघटनात्मक वातावरण यांचा परस्पर संबंध अभ्यासणे.

**संशोधनाची दुय्यम उद्दिष्टे**

१) कोल्हापूर शहरातील मराठी माध्यमांच्या माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांच्या प्रशासकीय वर्तनाचा अभ्यास करणे.

२) कोल्हापूर शहरातील इंग्रजी माध्यमांच्या माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांच्या प्रशासकीय वर्तनाचा अभ्यास करणे.

३) कोल्हापूर शहरातील मराठी माध्यमांच्या माध्यमिक शाळांच्या संघटनात्मक वातावरणाचा अभ्यास करणे.

४) कोल्हापूर शहरातील इंग्रजी माध्यमांच्या माध्यमिक शाळांच्या संघटनात्मक वातावरणाचा अभ्यास करणे.

**५.६ संशोधनाची गृहितके**

१) माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक हा एक प्रशासक असतो.

२) माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापकाजवळ नेतृत्व गुण असतात.

३) माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापकांच्या प्रशासकीय वर्तनावरती माध्यमिक शाळेचे संघटनात्मक वातावरण अवलंबून असते.

**५.७ संशोधनाची व्याप्ती :**

१) प्रस्तुत संशोधनामध्ये कोल्हापूर शहरातील मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापकांच्या प्रशासकीय वर्तनाचा अभ्यास केला आहे.

२) प्रस्तुत संशोधनामध्ये कोल्हापूर शहरातील इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापकांच्या प्रशासकीय वर्तनाचा अभ्यास केला आहे.

३) प्रस्तुत संशोधनात कोल्हापूर शहरातील मराठी माध्यमांच्या शाळांच्या संघटनात्मक वातावरणाचा अभ्यास केला आहे.

४) प्रस्तुत संशोधनात कोल्हापूर शहरातील इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या संघटनात्मक वातावरणाचा अभ्यास केला आहे.

**५.८ मर्यादा**

१. संशोधकांचे संशोधन हे कोल्हापूर शहरापुरती मर्यादित आहे.

२. कोल्हापूर शहरातील मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांपुरती मर्यादित आहे.

**५.९ संशोधन प्रकरण योजना**

प्रस्तुत संशोधनाची मांडणी खालील प्रकरणानुसार केली आहे.

**प्रकरण पहिले- प्रस्तावना**

या प्रकरणामध्ये ही समस्या कशी निर्माण झाली तिची गरज व महत्त्व यांचा ऊहोपोह करून समस्येचे शब्दांकन केले आहे. तसेच संशोधनाची उद्दिष्टे गृहितके, व्याप्ती व मर्यादा आदी बाबींचा ऊहापोह केला आहे.

**प्रकरण दुसरे- संबंधित साहित्याचा आढावा**

या प्रकरणात संशोधन कार्याच्या संदर्भात उपयुक्त ठरणाऱ्या व यापूर्वी झालेल्या संशोधन अहवालांचा आढावा घेतला आहे. तसेच संशोधन समस्येशी निगडित संदर्भ ग्रंथामधील सामग्रीचे संकलन, साहित्यातील लेख, माहिती आदींचे संकलन केले आहे.

**प्रकरण तिसरे- संशोधन कार्यपद्धती**

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधनाचा प्रकार पद्धती, नमुना, संशोधनाची साधने व कार्यपद्धती आदी अंतर्भाव आहे.

प्रस्तुत संशोधन हे वर्तमान परिस्थितीशी संबंधित असल्याने सर्वेक्षणात्मक पद्धतीचा वापर केला आहे. या प्रकरणात संशोधन कार्याच्या पद्धतीविषयी सर्वेक्षणात्मक पद्धतीच्या अंतर्गत येणाऱ्या सामग्रीच्या संकल्पनासाठी वापरल्या जाणाऱ्या प्रश्नावली आदी तंत्रविषयी तपशीलवार ऊहापोह केला

आहे. त्याप्रमाणे नमुना निवड, संशोधनाची साधने यांची माहिती दिली आहे.

**प्रकरण चौथे- संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने कोल्हापूर शहरातील इंग्रजी, मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापकाचे प्रशासकीय वर्तन व संघटनात्मक वातावरण याचा अभ्यास प्रश्नावली व वर्तनश्रेणीच्या माध्यमातून घेतला व मिळालेल्या माहितीचे योग्य संख्याशास्त्रीय विश्लेषण केलेले आहे व अर्थनिर्वचन योग्य त्या पद्धतीने केलेले आहे.

**प्रकरण पाचवे - सारांश, निष्कर्ष, शिफारशी**

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधकाने संशोधन अहवालाचा थोडक्यात सारांश देऊन मिळालेल्या माहितीच्या आधारे अर्थ-निर्वचन करून निष्कर्ष काढलेले आहेत व मिळालेल्या निष्कर्षावर आधारित शिफारशी सुचविल्या आहेत. त्याचप्रमाणे प्रस्तुत समस्येचे अधिक चांगल्या प्रकारे आकलन होण्यासाठी प्रस्तुत संशोधन विषयाशी प्रत्यक्षपणे निगडित नसलेल्या तथापि, उपयुक्त ठरणाऱ्या काही समस्यांचा पुढील संशोधनासाठी निर्देश केलेला आहे.

## ५.१० संशोधनाचे निष्कर्ष

संशोधकाने संशोधन साधनाच्या सहाय्याने ज्या माहितीचे संकलन केले त्याचे सारणीमध्ये रूपांतर केले व त्यानंतर विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले. उद्दिष्टानुसार निष्कर्ष काढण्यात आले.

मुख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तन अभ्यासण्यासाठी 'प्रशासकीय वर्तनमापन श्रेणी तसेच शाळांचे संघटनात्मक वातावरण अभ्यासण्यासाठी शालेय संघटनात्मक वातावरण वर्णनात्मक प्रश्नावली (SOCDQ) या दोन प्रमाणित चाचण्यांच्या सहाय्याने मिळालेल्या माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन करून उद्दिष्टानुसार खालीलप्रमाणे निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत.

१. कोल्हापूर शहरातील माध्यमिक शाळांमधील जास्तीत जास्त मुख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तन हे नेहमी (Always) चांगले आढूळन येते. (तक्ता क्र. ९)

२. कोल्हापूर शहरातील माध्यमिक शाळांतील फारच कमी मुख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तन वारंवार चांगले (Frequently) या श्रेणीत आढळून येते. (तक्ता क्र. ९)

३. कोल्हापूर शहरातील माध्यमिक शाळांतील कोणतेच मुख्याध्यापक, कधीतरी चांगले प्रशासकीय वर्तन क्वचित चांगले प्रशासकीय वर्तन, कधीच चांगले प्रशासकीय वर्तन नसणे, या श्रेणीत आढळून आले नाहीत.

१) कोल्हापूर शहरातील मराठी माध्यमाच्या शाळांच्या जवळजवळ सर्वच मुख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तन हे चांगले प्रशासकीय वर्तन या श्रेणीमध्ये आढळून येते. (तक्ता क्र. ९)

२) कोल्हापूर शहरातील इंग्रजी माध्यमांच्या बहुतांश शाळांमधील मुख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तन हे नेहमी चांगल्या प्रशासकीय वर्तन श्रेणीमध्ये आढळून येते.

३) कोल्हापूर शहरातील मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या फारच कमी मुख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तन हे वारंवार चांगले (Frequently) या श्रेणीमध्ये आढळून येते. (तक्ता क्र. ९)

४) कोल्हापूर शहरातील मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळांतील मुख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तन कधीतरी चांगले प्रशासकीय वर्तन, क्वचित चंगले प्रशासकीय वर्तन, कधी चांगले प्रशासकीय वर्तन नसणे, या श्रेणीमध्ये आढळून आले नाही. (तक्ता क्र. ९)

५) कोल्हापूर शहरातील जास्तीत जास्त मुख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तन हे नियोजन आणि संप्रेषण या क्षेत्रामध्ये चांगले दिसून येते. (तक्ता क्र.१०, ११, १२)

६) कोल्हापूर शहरातील संशोधकांनी निवडलेल्या ३९ शाळांपैकी ११ खुले (Open), ९ स्वयंशासित (Autonomous), १० परिचित (Familiar), ४ अधिकारवादी (Controlled), ५ पालकत्व (Paternal) या संघटनात्मक वातावरण प्रकारामध्ये येतात. (तक्ता क्र.५५)

कोल्हापूर शहरातील एकही शाळा बंदिस्त (Closed) या प्रकरात आढळून आली नाही. (तक्ता क्र. ५५)

७) कोल्हापूर शहरातील मराठी माध्यमांच्या ३३ शाळांपैकी १० खुले (Open), ७ स्वयंशासित (Autonomous), ९ परिचित (Familiar), ३ अधिकारवादी (Controlled), ४ पालकत्व (Paternal) या संघटनात्मक वातावरण प्रकारामध्ये येतात. (तक्ता क्र. ५६)

८) कोल्हापूर शहरातील इंग्रजी माध्यमांच्या ६ शाळांपैकी १ खुले (Open), २ स्वयंशासित (Autonomous), १ परिचित (Familiar), १ अधिकारवादी (Controlled), १ पालकत्व (Paternal) या संघटनात्मक वातावरण प्रकारामध्ये येतात. (तक्ता क्र. ५७)

बंदिस्त वातावरण या प्रकारात एकही शाळा आढळून आली नाही.

१) खुले (Open) शालेय संघटनात्मक वातावरण आणि त्या शाळांच्या मुख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तन या दोन चलामधील सहसंबंध ०.५८ म्हणजे **लक्षात घेण्याजोगा चांगला सहसंबंध आढळून आला.** (तक्ता क्र. ५८)

२) स्वयंशासित (Autonomous) शालेय संघटनात्मक वातावरण आणि त्या शाळांच्या मुख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तन या दोन चलामधील सहसंबंध ०.७९ म्हणजे **खूप चांगला सहसंबंध आहे.** (तक्ता क्र. ५९)

३) परिचित (Familiar) शालेय संघटनात्मक वातावरण आणि त्या शाळांच्या मुख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तन या दोन चलामधील सहसंबंध ०.७८ म्हणजे **खूप चांगला सहसंबंध आहे.** (तक्ता क्र. ६०)

४) अधिकारवादी (Controlled) शालेय संघटनात्मक वातावरण आणि त्या शाळांच्या मुख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तन या दोन चलामधील सहसंबंध ०.६३ म्हणजे **खूप चांगला सहसंबंध आहे.** (तक्ता क्र. ६१)

५) पालकत्व (Paternal) टप्पा शालेय संघटनात्मक वातावरण आणि त्या शाळांच्या मुख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तन या दोन चलामधील सहसंबंध ०.७९ म्हणजे **खूप चांगला सहसंबंध आहे.** (तक्ता क्र. ६२)

मुख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तन व त्यांच्या शाळांचे संघटनात्मक वातावरण यांच्या दोन चलांमधील **खूप चांगला सहसंबंध आढळून आला.**

## ५.११ शिफारशी

१. मुख्याध्यापकांसाठी प्रशिक्षणवर्ग आयोजित करावेत.

२. नेतृत्वासाठी सर्व मुख्याध्यापक व शिक्षकांची निवड करावी.

३. मुध्याध्यापकांना संस्था व शासनस्तरावरती प्रोत्साहन द्यावे.

४. मुख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तन सुधारण्यासाठी कार्यशाळा, सेमीनार आयोजित करावेत.

५. प्रशासकीय वर्तन क्षेत्रातील मुख्याध्यापकांच्या निर्णयक्षमता व संघटन या क्षेत्रात वाढीसाठी प्रयत्न करावेत.

६.शालेय संघटनात्मक वातावरण चांगले राहण्यासाठी संस्था वा शासनाने मुख्याध्यापकांना जादा आधिकार द्यावेत.

## ५.१२ पुढील संशोधनासाठी विषय

१. प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तन व त्याच्या शाळेतील संघटनात्मक वातावरणाचा परिणाम.

२. मराठी माध्यमाच्या शाळेतील व इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील मुख्याध्यापकाच्या प्रशासकीय वर्तनाचा अभ्यास करणे.

३. रात्रशाळेतील मुख्याध्यापकांच्या प्रशासकीय वर्तनाचा व शालेय संघटनात्मक वातावरणाचा परिणाम याचा अभ्यास करणे.

४. ऊर्दू व गुजराथी मुख्याध्यापकांच्या प्रशासकीय वर्तनाचा व शालेय संघटनात्मक वातावरणाचा होणारा परिणाम याचा अभ्यास करणे.

५. ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या शालेय संघटनात्मक वातावरणावरती होणारा परिणाम याचा अभ्यास करणे.

६. कायम विनाअनुदानित माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापकाच्या प्रशासकीय वर्तनाचा आणि शालेय संघटनात्मक वातावरण याचा परस्पर संबंधाचा

७. सैनिकी शाळेमधील मुख्याध्यापकाच्या प्रशासकीय वर्तनाचा आणि शालेय संघटनात्मक वातावरणाच्या परस्पर संबंधाचा अभ्यास करणे.

८. माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापकाच्या प्रशासकीय वर्तनावरती शिक्षक, विद्यार्थी, पालकाचा होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे.

९. निवासी माध्यमाच्या शाळेतील मुख्याध्यापकाच्या प्रशासकीय वर्तनाचा व त्याच्या शाळांचा शालेय संघटनात्मक वातावरण यांचा परस्पर संबंधाचा अभ्यास करणे.

१०. मुख्याध्यापकाच्या प्रशासकीय वर्तनावरती शाळा एक लोकसमूदायामध्ये केंद्र बनविण्यास येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.

# संदर्भ ग्रंथ व सूची


जाधव एम.एल. / माने आर.आर. (२००५) शालेय व्यवस्थापन, कोल्हापूर, फडके प्रकाशन

दुनाखे ए.(१९९७) शालेय व्यवस्थापन, प्रशासन व संघटन पुणे ३०- नूतन प्रकाशन.

नागतोडे के.के. (१९९७) शालेय व्यवस्थापन,शैक्षणिक संरचना आणि भारतीय आधुनिक विचार प्रवाह नागपूर ४४० ००२ विद्या प्रकाशन.

महाराष्ट्र ज्युकेशन जर्नल (१९९८) महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शाळा,मुख्याध्यापक संघ महामंडळ

मुळे आर.एस. व उमाठे व्ही.टी. (२०००) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, महाराष्ट्र विद्यापीठ, नागपूर १२, ग्रंथ निर्मिती मंडळ, साहित्य प्रसारक केंद्र.

शिक्षण व सेवा योजना विभाग,महा.शासन माध्यमिक शाळा संहिता (१९८६), महाराष्ट्र शासन.

उपासनी एन. के. व कुलकर्णी के.व्ही. (जानेवारी १९७६) सुबोध संख्याशास्त्र, पुणे ३०. श्री विद्या प्रकाशन.

पंडित बन्सीबिहारी (१९८९) शिक्षणातील संशोधन, पुणे, नूतन प्रकाशन.

शैक्षणिक व्यवस्थापन - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक (सप्टेंबर २००५), प्रथम प्रकाशन - १९९३ प्रकाशन क्रमांक ३९३

इंदापूरकर सी.डी. (सप्टेंबर १९९३) शिक्षण समीक्षा - माध्यमिक शाळातील गर्दी

बोधनकर पी.आर. (जाने. १९९४) शिक्षण समीक्षा - शालेय वातावरण आणि मुलांवरील ताण

कांबळे बी.एन. (फेब्रु १९९५) शिक्षण संक्रमण - परीक्षेतील पर्यवेक्षक

शेडमाके एस.पी. (२००१) शिक्षण समीक्षा – विद्यार्थ्यांचे गैरवर्तन – वर्ग व्यवस्थापनेतील समस्या

घटे एल.जी. (२००३) भारतीय शिक्षण – मुख्याध्यापकांची चिंतनिका

पाईकराव व्ही. (२००३) भारतीय शिक्षण मंडळ – प्रभावशाली मुख्याध्यापक बनण्यासाठी शालेय व्यवस्थापन शिक्षणक्रम.

पाटील ए.बी. (२००४) जीवन शिक्षण, पुणे ३०, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन प्रशिक्षण परिषद.

सुरडकर ए. (२००५) मुंबई ४०० ०६७, बालशक्ती – भारतीय शिक्षण मंडळ – मुलांच्या शैक्षणिक विकासात पालकांचा सहभाग.

Best John and Kahn (2003) Research in Education, New Delhi, 110 016 : Prentice Hall of India

Buch M.B. (1968) First Survey of Educational Research, New Delhi, 110 016: NCERT.

Buch M.B. (1978) Second Survey of Educational Research, New Delhi 110 016: NCERT.

Buch M.B. (1983) Third Survey of Educational Research, New Delhi 110 016:NCERT.

Buch M.B. (1988) Fourth Survey of Educational Research, New Delhi 110 016:NCERT.

Buch M.B. (1992) Fifth Survey of Educational Research, New Delhi 110 016: NCERT.

Jumnal Bassappa M. (1991) Adjustment Problems of students of Navodaya Vidyalaya in Karnataka in Relation to the organizational climate of the school a study (Uppublished M.Phil. Dissertation, Shivaji University, Kolhapur.

Sharma Motilal (Nov. 1982) Diagnosing School Climate International Consultants Sardar Shahr, Rajasthan (India).

Taj Haseen (1996) Administrative Behavior Scale (ABS) Psy-Edu. Testing Centre, New Delhi, 110 016 : Janakpuri.

# परिशिष्टे

अ) प्रमाणित प्रश्नावली व वर्तनश्रेणीतील भाषांतरातील दुरुस्त्या सुचविण्याबाबत.

ब) प्रमाणित प्रश्नावली व वर्तनश्रेणीतील भाषांतरातील दुरुस्त्या सुचविणाऱ्या तज्ञांची यादी

क) प्रश्नावली व श्रेणी सोडविण्याबाबतची पत्रे

ड) मुख्याध्यापकाचे प्रशासकीय वर्तन मापनश्रेणी (मराठी)

इ) शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठाचे पत्र

ई) शालेय संघटनात्मक वातावरण वर्तन प्रश्नावली (मराठी)

प) Headmaster Administrative Test (English)

फ) School Organizational Climate Deiscription Questionnari (Eng.)

ब) मराठी व इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापकांची प्रश्नावली व वर्तनश्रेणी सोडविण्याबाबतची पत्रे.

दिनांक :

प्रति,

______________________________

______________________________

______________________________

______________________________

**विषय : प्रश्नावली व श्रेणीतील दुरुस्त्या सुचविण्याबाबत...**

आदरणीय सर / मॅडम,

**मी प्रताप रामचंद्र पाटील** सध्या शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या ठिकाणी सन २००६-०७ यावर्षी एम.फिल्. करत असून माझ्या सादर करावयाच्या शोधनिबंधाचा विषय- 'कोल्हापूर शहरातील माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांचे प्रशासकीय वर्तन आणि त्यांच्या शाळांचे संघटनात्मक वातावरण यांचा परस्परसंबंध - एक अभ्यास' हा असून तो डॉ. पाटणकर पी. एस. अधिव्याख्याती शिक्षणशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. त्यासाठी प्रस्तुत संशोधनात डॉ. हसीन ताज यांची प्रशासकीय वर्तन मापन श्रेणी व डॉ. मोतिलाल शर्मा यांची शालेय संघटनात्मक वातावरण मुख्याध्यापकांची वर्तन प्रश्नावली वापरणार असून, त्या प्रमाणित प्रश्नावली व वर्तनश्रेणीचे मूळ स्वरूप इंग्रजीमध्ये आहे. त्याचे मराठीत भाषांतर केले आहे आणि त्या मराठी माध्यमातील भाषांतरात काही चुका व दुरुस्त्या असतील तर त्या सुधारून द्याव्यात. त्याचा मी माझ्या संशोधनासाठी वापर करीन.

धन्यवाद,
याबद्दल मी आपला ऋणी राहीन.

आपला विश्वासू,

**प्रताप रामचंद्र पाटील**
एम.ए.,एम.एड्.